I.O.
तपासी अंमलदार

N.C.R.B. (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

निरीक्षक वर्तक नगर पोलीस ठाणे शहर

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** वर्तक नगर **Year (वर्ष):** 2021
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0105 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/04/2021 07:41 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 19/04/2021
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/04/2021
**Time From (वेळेपासून):** 15:25 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:25 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/04/2021 **Time (वेळ):** 07:31 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 010 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/04/2021 07:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 2 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** स्थानिक संस्था कर माजिवडा ,कार्यालयाच्या तळमजला आवारठाणे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
**(a) Name (नाव):** बाबुभाई धरमशी नोर
**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

पोलीस निरीक्षक ठाणे शहर

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 404,दादा पाटीलवाडी, नौपाडा, ,रत्नमनी अपार्टमेंट ,ठाणे पश्चिम,वर्तक नगर,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 404,दादा पाटीलवाडी, नौपाडा, ,रत्नमनी अपार्टमेंट ,ठाणे पश्चिम,वर्तक नगर,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9987484222**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शरद पुंडलिक उघाडे | | | 1. 1004,खारेगाव, कळवा, ,विमल हाईटस, पारसिकनगर,ठाणे,वर्तक नगर, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्तकनगर पो स्टे गु र नं ॥ 105/2021 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 (सुधारणा 26 जुलै 2018 ) चे कलम 7 अन्वयेफिर्यादी - बाबुभाई धरमशी नोर, वय 40 वर्षे, व्यवसाय- स्टेशनरी दुकान, राहणार 404, रत्नमनी अपार्टमेंट, दादा पाटीलवाडी, नौपाडा, ठाणे पश्चिम जि. ठाणे मोबाइल नंबर 09987484222आरोपी -लोकसेवक शरद पुंडलिक उघाडे, वय 55 वर्षे, लिपिक स्थानिक संस्था कर कार्यालय,(वर्ग 3) ठाणे महानगरपालिका रा. 1004, विमल हाईटस, पारसिकनगर, खारेगाव, कळवा, ठाणेअ.घ.ता.वेळ व ठिकाण दिनांक 19/4/2021 रोजी 15.25वा स्थानिक संस्था कर माजिवडा कार्यालयाच्या तळमजला आवारात.लाच रक्कम 45,000/- रुपयेप्रकार ता म वेळी व जागी यातील लोकसेवक आरोपीत याने फिर्यादीचे LBT कमी केल्याचा मोबदला म्हणुन लोकसेवक आरोपीत शरद पुंडलिक उघाडे, वय 55 वर्षे, लिपिक स्थानिक संस्था कर कार्यालय,(वर्ग 3) ठाणे महानगरपालिका रा. 1004, विमल हाईटस, पारसिकनगर, खारेगाव, कळवा, ठाणे यांनी 50,000 /-रु. लाचेची मागणी करून, तडजोडीअंती 45,000/- रू. घेण्याचे कबुल करून, त्यांनी फिर्यादीकडुन 45,000/- रू. स्थानिक संस्था कर, माजिवडा कार्यालयाचे तळमजला आवारात दिनांक 19/4/2021रोजी 15.25 वाजता स्विकारले आहे. तरी फिर्यादीची आरोपीत याच्याविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. वर्तकनगर पो स्टे गु र नं ॥ 105/2021 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 (सुधारणा 26 जुलै 2018 ) चे कलम 7 अन्वये

फिर्यादी - बाबुभाई धरमशी नोर, वय 40 वर्षे, व्यवसाय- स्टेशनरी दुकान, राहणार 404, रत्नमनी अपार्टमेंट, दादा पाटीलवाडी, नौपाडा, ठाणे पश्चिम जि. ठाणे मोबाइल नंबर 09987484222

आरोपी -लोकसेवक शरद पुंडलिक उघाडे, वय 55 वर्षे, लिपिक स्थानिक संस्था कर कार्यालय,(वर्ग 3) ठाणे महानगरपालिका रा. 1004, विमल हाईटस, पारसिकनगर, खारेगाव, कळवा, ठाणे

अ.घ.ता.वेळ व ठिकाण – दिनांक 19/4/2021 रोजी 15.25वा स्थानिक संस्था कर माजिवडा कार्यालयाच्या तळमजला आवारात.

लाच रक्कम – 45,000/- रुपये

प्रकार – ता म वेळी व जागी यातील लोकसेवक आरोपीत याने फिर्यादीचे LBT कमी केल्याचा मोबदला म्हणुन लोकसेवक आरोपीत शरद पुंडलिक उघाडे, वय 55 वर्षे, लिपिक स्थानिक संस्था कर कार्यालय,(वर्ग 3) ठाणे महानगरपालिका रा. 1004, विमल हाईटस, पारसिकनगर, खारेगाव, कळवा, ठाणे यांनी 50,000/-रु. लाचेची मागणी करून, तडजोडीअंती 45,000/- रू. घेण्याचे कबुल करून, त्यांनी फिर्यादीकडुन 45,000/- रू. स्थानिक संस्था कर, माजिवडा कार्यालयाचे तळमजला आवारात दिनांक 19/4/2021रोजी 15.25 वाजता स्विकारले आहे. तरी फिर्यादीची आरोपीत याच्याविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

पोलीस निरीक्षक
वर्तकनगर पो. स्टे.
ठाणे शहर



वर्तकनगर पो स्टे गु र नं ॥ 105/2021 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 (सुधारणा 26 जुलै 2018 ) चे कलम 7 अन्वये

मी बाबुभाई धरमशी नोर, वय 40 वर्षे, व्यवसाय- स्टेशनरी दुकान, राहणार 404, रत्नमनी अपार्टमेंट, दादा पाटीलवाडी, नौपाडा, ठाणे पश्चिम जि. ठाणे मोबाइल नंबर 09987484222

मी वरीलप्रमाणे असून, वर नमूद पत्त्यावर मागील 12 वर्षापासून माझे परिवारासह राहणेस आहे व साधना बिल्डींग, शॉप नंबर 1, शिवाप्रसाद हॉटेल जवळ, ठाणे येथे माझे स्वतःचे सत्यम स्टेशनरी अँण्ड झेरॉक्स या नावाचे दुकान चालवितो. त्यावरच माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी दिनांक 15/04/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात हजर राहून, खालील आशयाची तक्रार लिहून दिली आहे.

माझे वर नमुद दुकानावर ठाणे महानगरपालिका, ठाणे एल.बी.टी. माजिवडा ऑफीस यांचेकडुन, प्रथम दिनांक 31/03/2017 रोजी नोटीस दिली व त्या नोटीसमध्ये मला दिनांक 10/10/2018 रोजीपर्यंत सर्व खरेदी बिलं घेवुन कार्यालयात येण्यास सांगितले होते. परंतु मी गेलो नाही.

त्यानंतर ठाणे महानगरपालिका, ठाणे एल.बी.टी. माजिवडा ऑफीस यांचेकडुन दिनांक 24/01/2020 रोजीचे रिमाइंडर लेटर व दिनांक 18/01/2021 रोजीचे फायनल रिमाइंडर लेटर मला मिळाले. त्यामध्ये त्यांनी मला पत्रात नमुद असलेले कागदपत्र घेवुन, येण्यास सांगितले होते.

वरील प्रमाणे ठाणे महानगरपालिका, ठाणे एल.बी.टी. माजिवडा ऑफीसकडुन प्राप्त झालेल्या नोटीसच्या अनुषंगाने मी दिनांक 22/01/2021 रोजी ठाणे महानगरपालिका, ठाणे एल.बी.टी., माजीवडा ऑफीसमध्ये जावुन माझेकडे उपलब्ध असलेले कागदपत्र जमा केले. त्यावेळी त्यांनी माझ्या कागदपत्रांमध्ये त्रुटी काढुन, मी दिलेले कागदपत्रांमध्ये त्यांना आवश्यक असलेले कागदपत्र नसल्याचे सांगितले व त्याव्यतिरिक्त काही आवश्यक कागदपत्र मला ऑफीसमध्ये जमा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 11/02/2021 रोजी पुन्हा ठाणे महानगरपालिका, ठाणे एल.बी.टी., माजीवडा ऑफीसमध्ये जावुन त्यांनी मागणी केलेले कागदपत्र हजर केले. त्यावेळी एल.बी.टी., माजीवडा ऑफीसने मला पुन्हा त्रुटी काढुन त्यांना लागणारे काही आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्यास सांगितले.

त्याप्रमाणे मी दिनांक 22/02/2021 रोजी पुन्हा एल.बी.टी., माजीवडा, ठाणे या ऑफीसमध्ये जावुन, त्यांनी दिनांक 11/2/2021 रोजी सांगितलेल्या कागदपत्रांची पुर्तता करून ते कागदपत्र ठाणे एल.बी.टी., माजीवडा ऑफीसमध्ये जमा केले.

मी वरीलप्रमाणे जमा केलेल्या कागदपत्रांवर ठाणे महानगरपालिका, ठाणे एल.बी.टी., माजीवडा ऑफीसकडुन काय कार्यवाही करण्यात आली हे जाणुन घेण्यासाठी मी पुन्हा दिनांक 04/03/2021 रोजी ठाणे एल.बी.टी.ऑफीस माजीवडा येथे गेलो आणि त्यावेळी आमचे विभागाशी संबंधित असलेले लोकसेवक श्री.शरद उघाडे यांना जावुन भेटलो व मला ठाणे महानगरपालिका, ठाणे एल.बी.टी.,माजीवडा ऑफीसकडुन मिळालेल्या नोटीसबाबत त्यांचेशी चर्चा केली. त्यावेळी श्री.शरद उघाडे यांनी माझे दुकानास सन 2013 ते 2016 या 03 वर्षा करीता आलेला एल.बी.टी. टॅक्सचे कॅलक्युलेशन केले व मला एकुण 2,59,782/- रूपये एल.बी.टी.टॅक्स भरणा करण्यास सांगितले.

त्यावेळी मी त्यांना, माझा एवढा मोठा व्यवसाय नसुन, मला इतका जास्त एल.बी.टी. बसु शकत नाही, असे त्यांना सांगितले असता, त्यांनी मला तुला फाईन बसला असल्याने, एवढी रक्कम भरावीच लागेल असे सांगुन श्री.शरद उघाडे यांनी मला मी तुझे एल.बी.टी.टॅक्सचे पैसे कमी करून देतो, परंतु त्या बदल्यात तुला मला काहीतरी दयावे लागेल असे बोलुन त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केली व एल.बी.टी.ची रक्कम कमी केल्यानंतर ज्यावेळी फोन करेन त्यावेळी भेटण्यास येण्याबाबत मला श्री.शरद उघाडे यांनी सांगितले. त्यानंतर मी तेथुन निघुन माझे दुकानात गेलो.

त्यानंतर दिनांक 25/03/2021 रोजी श्री.शरद उघाडे यांनी मला माझे मोबाईल फोनवर, फोन करून सांगितले की, मी तुझे एल.बी.टी. टॅक्सचे पैसे कमी केले असुन, आता तुला ठाणे महानगरपालिकेला एल.बी.टी.टॅक्सचे एकुण 1,00,162/- रूपये चेकने भरावे लागतील व मी केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन मला 50,000/- रूपये तुला दयावे लागतील असे श्री.शरद उघाडे यांनी सांगुन, मला 03 ब्लॅक चेक व त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम 50,000/- रूपये घेवुन दिनांक 05/04/2021 रोजी घेवुन येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे मी दिनांक 05/04/2021 रोजी मी 03 चेक घेवुन ठाणे महानगरपालिका, ठाणे एल.बी.टी., माजीवडा ऑफीसमध्ये गेलो व जावुन लोकसेवक श्री. शरद उघाडे यांना जावुन भेटलो. त्यावेळी त्यांनी मला एक चेक 75,806/- रू.चा, एक चेक 3,281/- रू.चा व एक चेक 21,075/- रू.चा असे एकुण 1,00,162/- रू.चे 03 चेक लिहुन देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी टी.एम.सी.एल.बी.टी. चे नावाने 03 चेक लिहुन दिले. त्यावेळी लोकसेवक श्री.शरद उघाडे यांनी मला माझे एल.बी.टी. टॅक्स कमी केल्याची ऑर्डर दाखवली व ही ऑर्डर पाहिजे असेल तर मी एल.बी.टी.टॅक्स कमी केल्याचा मोबदला म्हणुन मला 50,000/- रू.दे आणि ऑर्डर घेवून जा असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना माझे जवळ एवढे पैसे नसल्याचे सांगुन, माझे कडे फक्त 25 हजार रूपये असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री.शरद उघाडे यांनी मला पुर्ण 50,000/- रूपये पाहिजे त्याशिवाय मी तुझी ऑर्डर देणार नाही असे लोकसेवक श्री.शरद उघाडे यांनी मला सांगितले व पैशांची व्यवस्था करून, फोन करून एल.बी.टी.ऑफीस, माजीवडा, ठाणे या कार्यालयात भेटण्यास येण्यास सांगितले.

त्यानंतर दिनांक 12/04/2021 रोजी सकाळी लोकसेवक श्री.शरद उघाडे यांचा मला मोबाईलवर फोन आला होता. आणि त्यावेळी त्यांनी मला ऑफीसला का आला नाहीस ? याबाबत विचारले असता, मी त्यांना सांगितले की, मी आज माझे गावी जाणार असुन, मी गुरूवार दिनांक 15/04/2021 रोजी ठाण्यात परत येणार आहे व परत आल्यावर आपणास येवुन भेटतो असे सांगितले.

त्यानंतर आज दिनांक 15/04/2021 रोजी सकाळी पुन्हा लोकसेवक श्री.शरद उघाडे यांचा मला मोबाईलवर फोन आला व मला त्यांचे कार्यालयात भेटण्यास येण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना मी अजुन प्रवासात आहे. ठाण्यात आल्यावर आपल्याला ऑफीसमध्ये येवुन भेटतो असे सांगितले.

लोकसेवक श्री.शरद उघाडे यांनी माझे एल.बी.टी.टॅक्सची रक्कम कमी केल्याचा मोबदला म्हणुन माझेकडे मागणी केलेली 50,000/- रू. लाचेची रक्कम जर मी त्यांना दिली नाही तर ते माझे एल.बी.टी.टॅक्स कमी केल्याबाबतची ऑर्डर मला देणार नाहीत असे मला वाटले. परंतु मला लोकसेवक श्री.शरद उघाडे, ठा.म.पा., एल.बी.टी.माजीवडा कार्यालय, ठाणे, यांना लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नाही. म्हणून त्यांच्याविरूध्द कारवाई करणेकरीता मी दिनांक 15/04/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे हजर राहून तक्रार दिली आहे.

त्यानंतर पो.नि./राठोड यांनी माझे तक्रारीचे अनुषंगाने दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करणे आवश्यक आहे असे सांगुन दिनांक 15/04/2021 रोजी मा. प्रादेशिक परिवहन विभाग, ठाणे येथील दोन शासकीय पंचाना त्यांच्या कार्यालयात बोलावले. पो.नि. राठोड यांनी माझी त्या दोन्ही पंचांची ओळख करुन दिली व माझी तक्रार पंचाना दाखविली. सदरची तक्रार पंचानी वाचून त्यावर सहया केल्या तसेच पो.नि. राठोड यांनी समक्ष सही करून सदरची तक्रार आपल्या ताब्यात घेतली.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 15/04/2021 रोजी पंच साक्षीदार श्री. शेळके, लिपीक, प्रादेषिक परिवहन विभाग, ठाणे यांचे उपस्थितीत सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून ○एल.बी.टी.कार्यालय, माजीवडा, ठाणे या कार्यालयात लोकसेवक श्री. शरद उघाडे

यांचेकडे पडताळणी कारवाई केली असता, मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लोकसेवक श्री. शरद उघाडे यांनी माझेकडे स्पष्टपणे लाचेची मागणी केलेली नाही. त्यामुळे दिनांक 15/04/2021 रोजीची पडताळणी कारवाई थांबवून, पुन्हा दिनांक 16/04/2021 रोजी पडताळणी कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

परंतू दिनांक 16/04/2021 रोजी माझी अचानक तब्येत बिघडल्याने मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 19/04/2021 रोजी पुढील पडताळणी कारवाई करणेबाबत पोनिरी श्री. राठोड याना विनंती केली.

त्याप्रमाणे मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाई करणेकामी दिनांक 19/04/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात हजर झालो. त्यावेळी पंच साक्षीदार श्री. शेळके, लिपीक, प्रादेषिक परिवहन विभाग, ठाणे यांचे उपस्थितीत सर्व कायदेशीरबाबीची पुर्तता करून, लोकसेवक श्री. शरद उघाडे यांचेकडे त्यांचे एल.बी.टी. माजीवडा, ठाणे कार्यालय येथे पडताळणी कारवाई करण्याकरीता त्यावेळी माझे शर्टचे आतील बनियनमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात आला होता. मी व पंच श्री. शेळके असे आम्ही माझेकडील होन्डा अॅक्टीव्हा टु व्हीलर स्कुटी क्रमांक एम.एच. 04 जी ए. 1571 या दुचाकीवाहनाने स्थानिक संस्था कर कार्यालय, ठाणे महानगरपालिका, ठाणे कार्यालयात गेलो असता, कार्यालयात लोकसेवक श्री. शरद पुंडलिक उघाडे हे दिसून न आल्याने त्यांना स्पिकर ऑन करून फोन केला असता त्यावेळी त्यांनी मला मी जिथे बसतो, तिथे बसा, मी पाच दहा मिनिटात येतो असे सांगितले. त्याप्रमाणे श्री. उघाडे यांची वाट पाहात असतांना काही वेळानंतर लोकसेवक श्री. शरद उघाडे त्यांचे कॅबिनमध्ये आल्यानंतर आमच्यात एल.बी.टी. टॅक्स संदर्भात समक्ष बोलणी झाली. त्यावेळी मी त्याना माझी एल.बी.टी.ची ऑर्डर देण्यास सांगितली असता, लोकसेवक श्री. उघाडे यांनी मला पुर्ण घेवून ये, साहेब माझेवर ओरडले असल्याचे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना सध्या माझा धंदा बंद असून, काहीतरी कमी अशी विनंती केली असता, लोकसेवक श्री. उघाडे म्हणाले की, दोन साठ दिल्यानंतर दुसरी ऑर्डर घेवून जा, असे सांगून त्यांचं लॉस होणार नाही, माझ लॉस होणार असे सांगून त्यांना त्यांचं पेमेंट जाणार आहे आणि माझ लॉस होणार आहे, बाकी काही नाही. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, साहेब, कोरोनामुळे धंदा बंद करून बसलो आहे, बघा काहीतरी अँरेज करा प्लीज, त्यावेळी ते बोलले की, तुझ्यामुळे माझा लॉस करू का? त्यानंतर ते म्हणाले की, ''कितना देना है मेरा फिफ्टी देनेका, फोरटी फाय दे दो चलो'' असे सांगितल्यानंतर मी त्यांना 'हँ' असे सांगितले. तेव्हा ते बोलले की, पाँच हजार तेरे लिए लॉस करता हूँ ' त्यावेळी मी त्यांना सांगितले की, फोरटी फाय थाऊजंड तेव्हा ते बोलले हा, त्यावर मी ठिक आहे. तेव्हा ते बोलले की, तेरे लिए फायदा, पाँच हजार मेरा लॉस. त्यावर मी त्यांना ठिक आहे साहेब, मी अँरेज करतो असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री. उघाडे हे बोलले की, अभी क्या हूआ, त्यावर त्यांना सांगितले की, लेके आता हूँ. ते बोलले की, किधर से तेव्हा मी सांगितले की, अंबिका मे है ना किरणा स्टोर्ससे असे बोललो. त्यानंतर मी त्यांना सांगितले की, चलो, मैं लेके आता हैं, फोटीफाय थाऊजंड, ठिक है असे म्हणालो त्यावर ते म्हणाले की, कभी आएगा तेव्हा मी त्यांना सांगितले की, जैसे पैसा अँरेज होएगा, वैसा मै लेके आता हू , त्यावेळी ते म्हणाले की, तीन बजे तक आ जाओ त्यावर मी त्याना ठिक आहे. त्यानंतर मी व पंच शेळके असे आम्ही स्थानिक संस्था कर कार्यालय, ठाणे महानगरपालिका, ठाणे कार्यालयातुन बाहेर आलो मी व पंच श्री. शेळके असे होन्डा अॅक्टीव्हा टु व्हिलर स्कुटीने पडताळणी पथक ज्या ठिकाणी थांबून राहिलो होते. त्या ठिकाणी परत आलो

वरील प्रमाणे झालेल्या संभाषणावरून पोनिरी.राठोड यांनी तक्रादार व लोकसेवक यांचेत झालेले संभाषण अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे कार्यालयात जावून व्यवस्थित ऐकण्याचा निर्णय घेतला, त्याप्रमाणे अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात जावून तक्रादार व लोकसेवक यांचेत डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकल्यानंतर पोनिरी श्री. राठोड यांनी पंचास व मला सांगितले की, लोकसेवक श्री. शरद उघाडे यांनी एल.बी.टी. टॅक्स कमी केल्याचा मोबदला म्हणून माझेकडे तडजोडीअंती 45,000/-रु. लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणुन सुरु असलेल्या कारवाईमध्ये पडताळणी पंचनामा, सापळापूर्व पंचनामा व सापळा पंचनामा स्वतंत्रपणे करणे करीता पुरेसा अवधी नसल्याने, सदर कारवाईमध्ये पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा एकत्रित करण्याचा निर्णय घेतला. तसेच लाचेची रक्कम देण्यास विलंब झाल्यास लोकसेवक श्री शरद उघाडे यास संशय येवू नये म्हणून लागलीच अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयातच सापळा पुर्व पंचनामा कारवाई करण्याचा निर्णय पोनिरी राठोड यांनी घेतला व त्याचवेळी पोनिरी राठोड यांनी पंचासमक्ष मला लोकसेवक श्री. शरद उघाडे यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी लाचेची रक्कम 45,000/-रु. आहे काय? याबाबत विचारले असता, माझेकडे माझे बचतीमधले 45,000/-रु असल्याचे सांगितले.

त्यानंतर पोनिरी श्री. राठोड यांचे सुचनेनुसार मी माझ्याकडे असलेली रक्कम 45,000/-रू. हजर केले असता लागलीच सापळापुर्व कारवाई करण्यात आली. व स्थानिक संस्था कर कार्यालय, माजीवाडा, ठाणे महानगरपालिका, ठाणे कार्यालयात सापळा आजमाविण्याचा निर्णय पोनिरी. राठोड यांनी घेतला. त्याअनुषंगाने मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचनादिल्यानंतर मी सापळा कारवाईकामी हजर केलेल्या 45,000/- रूपये माझे शर्टचे डावे बाजूचे खिशात ठेवुन दिले त्यानंतर मी व पंच श्री. शेळके व सापळा पथक असे न्यु होराईझन स्कूल जवळ आलो. व त्याठिकाणी माझे षर्टचे आतमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावल्यानंतर मी व पंच श्री. शेळके असे स्थानिक संस्था कर कार्यालय, माजीवाडा, ठाणे महानगरपालिका, ठाणे या कार्यालयात आलो. व त्याचवेळी पोनिरी.राठोड यांचे सुचनेप्रमाणे उर्वरित सापळा पथक असे स्थानिक संस्था कर कार्यालय, माजीवाडा, ठाणे महानगरपालिका, ठाणे या कार्यालयाचे पहिल्या मजल्यावर व खाली कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन माझे पुर्व नियोजीत इशा-याची वाट पाहत थांबुन राहिले होते. त्यानंतर सुमारे पंधरा मिनिटानंतर मी स्थानिक संस्था कर कार्यालय, माजीवाडा, ठाणे महानगरपालिका, ठाणे कार्यालयाचे तळमजल्यावर खाली आलो. तेव्हा माझेत व लोकसेवक श्री. शरद उघाडे यांचेत कामाच्या अनुषंगाने समक्ष बोलणे झाले. त्यावेळी मी त्यांना पुरा है ना पेपर, पुरा फोरटी फाय.. असे बोललो त्यावर लोकसेवक श्री. शरद उघाडे यांनी कितना है.? असे विचारले. त्यावर मी फोरटी फाय पुरा, त्यावर लोकसेवक श्री. शरद उघाडे यांनी पुरा फोरटी फाय है, ना. असे बोलले त्यावर मी त्याना गींन लिजिऐ पुरा. असे बोललो त्यावर त्यानी माझेकडे लाचेची रक्कम मागणी केली त्यावर मी माझे शर्टचे खिशाचे आतील असलेली लाचेची रक्कम काढून लोकसेवक श्री. शरद उघाडे यांचेसमोर हजर केले असता त्यानी लाचेची रक्कम उजव्या हातानी स्विकारून त्यांचे नेसूस, पॅन्टचे पुढील उजवे खिशात ठेवले. त्यानंतर ठरलेल्या सुचनेप्रमाणे मी शर्टचे डावे हाताच्या बाहया वर करून, लोकसेवक श्री. शरद उघाडे यांनी लाचेची रक्कम स्विकारली असल्याबाबत पुर्व नियोजीत ईषारा केला.

त्यांनतर पोनिरी.राठोड यांनी लाचेची रक्कम स्विकारणारे लोकसेवक यांचेबाबत माझेकडून माहिती घेवुन, लोकसेवक श्री. शरद उघाडे यांना तक्रारदार यांचेकडून स्विकारलेली लाचेची रक्कम विचारली असता, लोकसेवक श्री. उघाडे यांनी त्यांच्या नेसूस पॅन्टचे पुढील उजव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम उजव्या हाताने खाली टाकून दिल्यानंतर पोनिरी श्री. राठोड यानी लोकसेवक यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट धरून ठेवले. व त्याचे सुचनेनूसार पंच श्री. शेळके यांनी सदरची लाचेची रक्कम उचलून त्यांचे ताब्यात घेतले. ती वेळ 1.25 वाजताची होती. त्यानंतर पो.नि.राठोड यांनी स्वतःची व दोन्ही पंचांची तसेच सापळा पथकातील कर्मचा-यांची लोकसेवक श्री. शरद उघाडे यांना ओळख करून देवुन लाचेची रक्कम स्विकारणा-या लोकसेवक श्री. शरद उघाडे यांना पुढील कारवाईकामी ताब्यात घेण्यात आले.

त्यानंतर पो.नि.राठोड यांनी ताब्यात घेतलेल्या लोकसेवक यांना त्यांचे संपुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव लोकसेवक शरद पुंडलिक उघाडे, वय 55 वर्षे, लिपिक स्थानिक संस्था कर कार्यालय,(वर्ग 3) ठाणे महानगरपालिका रा. 1004, विमल हाईटस, पारसिकनगर,

खारेगाव, कळवा, ठाणे असे असल्याचे सांगितले
तरी मी दिलेल्या 15/04/2021 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 15/04/2021 व दिनांक 19/04/2021 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी-सापळापुर्व-सापळा पंचनामा कारवाईत, माझे एल.बी.टी. कमी केल्याचा मोबदला म्हणून लोकसेवक शरद पुंडलिक उघाडे, वय 55 वर्षे, लिपिक स्थानिक संस्था कर कार्यालय,(वर्ग 3) ठाणे महानगरपालिका रा. 1004, विमल हाईटस, पारसिकनगर, खारेगाव, कळवा, ठाणे यांनी 50,000/-रु. लाचेची मागणी करून, तडजोडीअंती 45,000/- रू. घेण्याचे कबुल करून, त्यांनी माझेकडून 45,000/- रू. स्थानिक संस्था कर, माजिवाडा कार्यालयाचे तळमजला आवारात 15.25 वाजता स्विकारले आहे. तरी माझी त्यांच्याविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SANJAY BHIKU GAIKWAD(I (Inspector)) / PBMAH73722 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
वर्तकनगर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** **(ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** SANJAY BHIKU GAIKWAD
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMAH73722

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**